# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः06.09.2024** **वारःशुक्रवार**

---

1. गुजरातमध्ये सूरत इथे 'जलसंचय जन भागीदारी' अभियानाचा पंतप्रधानांच्या हस्ते आज शुभारंभ
2. आंध्र प्रदेश आणि तेलंगणतील पूरग्रस्तांना सर्वतोपरी मदतीसाठी केंद्र सरकार कटिबद्ध-कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांची ग्वाही
3. आयुष मंत्रालयाअंतर्गत येणाऱ्या शाखांतील विद्यार्थ्यांसाठी आता नॅशनल एक्झिट टेस्ट अनिवार्य आणि
4. पॅरिस पॅरालिम्पिक स्पर्धेत, ज्युदोमध्ये कपिल परमारची ऐतिहासिक कामगिरी, सर्व स्तरातून अभिनंदन

**पंतप्रधान-जलसंचय**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज सूरत इथे, दूरस्थ माध्यमातून, 'जल संचय जन भागीदारी' या अभियानाचा प्रारंभ होणार आहे. सध्या सुरू असलेल्या 'जल शक्ति अभियानाशी' हे अभियान संलग्न असणार आहे. या अभियानाद्वारे गुजरात राज्यातील जनता, स्थानिक स्वराज्य संस्था, उद्योगसंस्थाना पावसाच्या पाण्याचं पुनर्भरण अर्थात 'रेन हार्वेस्टींग' करण्यासाठी लागणाऱ्या आवश्यक सुविधा उभारण्यासाठी एकत्र आणण्याचा प्रयत्न केला जात आहे. या अभियानाअंतर्गत, गुजरातमध्ये सामुदायिक भागीदारीतून सुमारे 24 हजार 800 बांधकामं केली जात आहेत. पावसाच्या पाण्याची साठवणूक वाढवण्यासाठी आणि पाण्याची दीर्घकालीन शाश्वतता सुनिश्चित करण्यासाठी हे अभियान महत्त्वपूर्ण ठरणार आहे. दरम्यान, ब्रूनेई आणि सिंगापूर देशांच्या यशस्वी दौऱ्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी काल मायदेशी परतले.

**चौहान-आंध्र-पूर पाहणी**

आंध्र प्रदेशात आलेल्या पुरामुळे अंदाजे दीड लाख हेक्टरहून जास्त क्षेत्रावरील पिकांचं नुकसान झालं असून, 2 लाख शेतकऱ्यांना फटका बसला आहे असं केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी म्हंटलं आहे. विशेषत: हळद आणि फूल पिकांना अतिवृष्टीची झळ बसल्याचं त्यांनी सांगितलं. आंध्र प्रदेश आणि तेलंगणा या राज्यांतील पूरस्थितीची पाहणी करण्याकरता चौहान कालपासून दोन दिवसांच्या दौऱ्यावर आहेत. काल त्यांनी विजयवाडा, प्रकाशम धरण तसंच कृष्णा नदी लगतच्या पूरग्रस्त शेतांची हवाई पाहणी केली. पंचनामे करण्याची प्रक्रिया सुरू झाली असून, झालेल्या नुकसानीचे पंचनामे करून, दोन्ही राज्यांना केंद्राकडून सर्वतोपरी मदत देण्यात येईल असं आश्वासन त्यांनी यावेळी दिलं. पुरानंतर उद्भवलेली परिस्थिति सामान्य होण्यासाठी तसंच पिकं आणि दैनंदिन जीवनासाठी लागणाऱ्या वस्तूंची भरपाई सरकारकडून देण्यात येईल असं ते पुढे म्हणाले. आज ते तेलंगणातील खम्मम जिल्ह्याला भेट देणार आहेत. दरम्यान, आंध्र प्रदेश आणि तेलंगणा राज्यात पुरामुळे झालेलं नुकसान लक्षात घेऊन, सार्वजनिक क्षेत्रातील विमा कंपन्यांनी पुरग्रस्तांना पूर्ण मदत करावी असे निर्देश केंद्रीय अर्थ मंत्रालयाने दिले आहेत.

**नुकसान भरपाई**

महाराष्ट्रात गेल्या वर्षी नोव्हेंबरपासून यंदाच्या जुलै महिन्यापर्यंतच्या कालावधीत अवकाळी पाऊस आणि अतिवृष्टीमुळे पिकांच्या झालेल्या नुकसानीसाठी शेतकऱ्यांना मदत म्हणून 307 कोटी रुपयांचा निधी वितरीत करायला राज्य शासनानं मंजुरी दिली आहे. याबाबतचा शासननिर्णय काल जारी करण्यात आला.

**जम्मू-काश्मीर प्रचार**

जम्मू-काश्मीर मधील विधानसभा निवडणुकीच्या प्रचारासाठी भारतीय जनता पक्षाने काल आपल्या 40 आघाडीच्या प्रचारकांची नावे जाहीर केली. यात, पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, भाजपचे अध्यक्ष जे. पी. नड्डा आणि उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांचा समावेश आहे. याबरोबरच केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, मनोहरलाल खट्टर, जी. किशन रेड्डी, जितेंद्र सिंह आणि शिवराजसिंह चौहान हे देखील प्रचाराची धुरा सांभाळतील. 90 सदस्यीय जम्मू-काश्मीर विधानसभेसाठी 18 सप्टेंबर, 25 सप्टेंबर आणि 1 ऑक्टोबर अशा तीन टप्प्यांत निवडणुका होणार आहेत.

**विशाल प्रकल्प**

महाराष्ट्र राज्य शासनाने काल, 1 लाख 17 हजार 220 कोटी रुपये गुंतवणुकीच्या उच्च तंत्रज्ञानावर आधारित 4 विशाल प्रकल्पांना मान्यता दिली. या प्रकल्पांमुळे सुमारे 29 हजार रोजगार निर्मिती होण्याचा अंदाज आहे. पुणे, पनवेल, छत्रपती संभाजी नगर आणि अमरावतीमध्ये हे प्रकल्प उभारण्यात येणार आहेत.

**पश्चिम-बंगाल**

पश्चिम बंगालमधील आरोग्य आणि कुटुंब कल्याण विभागानं डॉक्टर बिरुपक्ष बिस्वास आणि डॉक्टर अविक डे यांना निलंबित केलं आहे. कोलकात्यातील महिला डॉक्टरवरील अत्याचार आणि मृत्यू प्रकरणानंतर या दोघांची नावे समोर आली आहेत. राज्यातील कनिष्ठ श्रेणी डॉक्टर्सना तसंच शिक्षकांना धमकावल्याचा त्यांच्यावर आरोप आहे. डॉक्टर बिस्वास, बरदूआन वैद्यकीय महाविद्यालयांत वरिष्ठ निवासी वैद्यकीय अधिकारी म्हणून काम करतात तर डॉक्टर अविक हे रेडिओलॉजी विभागात कार्यरत आहेत. आरजी कार वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयाचे माजी प्राचार्य डीआर संदिप घोष यांच्यासह अनेक बेकायदेशीर कामांमध्ये त्यांच्या कथित सहभागाच्या संशयावरून ही कारवाई करण्यात आली असून या घटनेनंतर जनक्षोभ शांत करण्यासाठी त्यांना निलंबित करण्यात आल्याचं सांगण्यात येत आहे.

**आयुष-एक्झिट परीक्षा**

आयुर्वेद, युनानी आणि होमिओपॅथी शाखांमध्ये 2021-22 पासून शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना नॅशनल एक्झिट टेस्ट अर्थात एन एक्स टी देणं अनिवार्य असणार आहे अशी घोषणा केंद्रीय आयुष मंत्री प्रतापराव जाधव यांनी काल केली. या संदर्भात विद्यार्थ्यांच्या शंकांचं निरसन करण्याच्या दृष्टीनं स्थापन करण्यात आलेल्या समितीच्या शिफारशीनुसार हा निर्णय घेण्यात आल्याचं त्यांनी काल नवी दिल्लीत प्रसारमध्यमांशी बोलताना सांगितलं. एक वर्षांची आंतरवासीता अर्थात इंटर्नशीप पूर्ण केल्यानंतर राज्य अथवा राष्ट्रीय स्तरावर परवाना मिळवण्यासाठी तसंच नोंदणी करण्यासाठी ही परीक्षा देणं अनिवार्य करण्यात आलं आहे.

**शिष्यवृत्ती-मुदतवाढ**

केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने, 2024-25 या वर्षासाठी, राष्ट्रीय शिष्यवृत्ती योजनेसाठी निवड करण्यात आलेल्या विद्यार्थ्यांना, अर्ज सादर करण्यासाठी मुदतवाढ दिली आहे. अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत या महिन्याच्या 30 तारखेपर्यंत वाढवण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील गुणवंत विद्यार्थ्यांची आठव्या इयत्तेनंतर होणारी गळती रोखण्यासाठी आणि त्यांना त्यांचं शालेय शिक्षण 12वी पर्यन्त पूर्ण करण्यासाठी, प्रोत्साहनपर हेतूनं ही शिष्यवृत्ती दिली जाते. ही योजना केवळ राज्य सरकार, सरकारी अनुदानित आणि स्थानिक संस्थांच्या शाळांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना लागू असून, प्रती वर्षी, प्रति विद्यार्थी 12 हजार रुपये शिष्यवृत्ती देण्यात येते.

**राजकोट किल्ला-न्यायालय**

महाराष्ट्रातील मालवण इथल्या राजकोट इथल्या पुतळा दुर्घटना प्रकरणातील आरोपी मूर्तीकार जयदीप आपटे आणि सल्लागार चेतन पाटील यांना 10 सप्टेंबरपर्यंत पोलीस कोठडी देण्याचे आदेश सिंधुदुर्ग जिल्हा न्यायालयानं काल दिले. या दोघांनाही काल स्थानिक न्यायालयात हजर करण्यात आलं. पाटील याला 30 ऑगस्ट रोजी कोल्हापूर इथून तर आपटेला गेल्या बुधवारी कल्याणमधून अटक करण्यात आली होती. दरम्यान न्यायालयासमोर सर्व समान असून, मूर्तिकार आपटेची सखोल चौकशी करण्यात येईल अशी ग्वाही  मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली आहे.

**पर्यावरणपूरक गणेशोत्सव**

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वैभवाची साक्ष देणाऱ्या सार्वजनिक गणेशोत्सवाला उद्यापासून प्रारंभ होत आहे. घराघरातही विघ्नहर्त्या गणरायाच्या स्वागताची जय्यत तयारी सुरू असून बाजारपेठामध्ये उत्साहाचं वातावरण आहे. हा गणेशोत्सव नागरिकांनी पर्यावरणपूरक पद्धतीनं साजरा करावा असं आवाहन पुणे महानगरपालिकेनं केलं आहे.

**नक्षली**

तेलंगणातील भद्राद्री कोथागुडेम जिल्ह्यातील जंगलात पोलीस आणि नक्षलवाद्यांमध्ये काल झालेल्या चकमकीत प्रतिबंधित CPI गटाचे 6 नक्षली ठार झाले. ठार झालेल्यां मध्ये 2 महिलांचा समावेश आहे. तेलंगणा पोलीसांच्या ग्रेहाऊंड या नक्षलविरोधी दलाचे 2 कमांडोज जखमी झाले असून त्यांच्यावर रुग्णालयांत उपचार सुरु आहेत. नक्षली ठिकाणावरुन शस्त्रास्त्र, अत्याधुनिक बंदुका, स्फोटकं आणि इतर साहित्य जप्त करण्यात आलं आहे.

**पॅरालिम्पिक-परमार**

पॅरिस इथे सुरू असलेल्या पॅरालिम्पिक स्पर्धेतील ज्युदो खेळात, पुरुषांच्या 60 किलो वजनीगटात भारताच्या कपिल परमार याने कास्य पदक पटकावत ऐतिहासिक कामगिरी केली आहे. पॅरालिम्पिक स्पर्धेत ज्युदो खेळात भारताने पहिल्यांदाच पदक पटकावलं आहे. त्याने ब्राझीलच्या खेळाडूचा 10-0 असा धुव्वा उडवला. या ऐतिहासिक कामगिरीबद्दल राष्ट्रपति द्रौपदी मूर्मू यांनी कपिल परमारचं अभिनंदन केलं आहे. 'अनेक अडथळ्यांवर मात करत, पॅरालिम्पिकमध्ये ज्युदो स्पर्धेत पदक जिंकणारा पहिला भारतीय बनून कपिलने  इतिहास रचला आहे.' असं त्यांनी आपल्या अभिनंदनपर संदेशात म्हंटलं आहे. उपराष्ट्रपती जगदीप धनखड, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देखील या ऐतिहासिक कामगिरीबद्दल कपिलचं अभिनंदन केलं आहे. कपिल परमारच्या या ऐतिहासिक कामगिरीनंतर, या स्पर्धेत, भारत, 25 पदकांसह 16 व्या स्थानावर आहे. यात 5 सुवर्ण, 9 रौप्य आणि 11 कास्य पदकांचा समावेश आहे.

**<u>हवामान</u>**

पुढील चार ते पाच दिवस पश्चिम आणि मध्य भारताच्या काही भागात मध्यम ते मुसळधार पावसाचा अंदाज भारतीय हवामान विभागाने वर्तवला आहे. या महिन्याच्या 11 तारखेपर्यंत छत्तीसगड, मध्य महाराष्ट्र, कोकण आणि गोवा, सौराष्ट्र आणि कच्छ, गुजरात, मध्य प्रदेश आणि विदर्भात  मुसळधार पावसाची शक्यता असल्याचं हवामान विभागाने म्हंटलं आहे. तर, तेलंगणा, कर्नाटकचा किनारी प्रदेश, आंध्र प्रदेशचा किनारी भाग आणि यानममध्ये 9 सप्टेंबरपर्यंत मुसळधार पावसाचा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे. इशान्ये कंदील राज्य, अंदमान आणि निकोबार बेटे, ओडिशा, पश्चिम बंगालचा काही भाग आणि सिक्कीममध्ये मध्यम ते मुसळधार पाऊस होण्याची शक्यता आहे.

# या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.